## छंद खाण्यापिण्याचा!

स्मिता भागवत.

मे महिना म्हणजे अमदावादचे भट्टीत रुपांतर होणे अटळ असते. सकाळचे सात वाजण्यापूर्वी उन्हाची रणरण चालू होते आणि संध्याकाळचे सात वाजले तरी तलखी कमी होत नाही. अशा उन्हात बसचा प्रवास नकोसा वाटतो. पर्याय नसेल तेव्हा तो करावा लागतो ते अलाहिदा! पण शक्य तो सारे ते तो टाळायचाच प्रयत्न करतात.

बडोदे शहरी एकदा गुजराती मान्यवर साहित्यिकाचा मस्त कार्यक्रम होता. म्हणून सिद्धार्थच्या – नवऱ्याच्या मित्रांनी सहकुटुंब कार्यक्रमात उपस्थित राहण्यासाठी सर्वांनी एकत्र गाड्या घेऊन जाण्याचा बेत ठरवला. आमच्याकडे तेव्हा गाडी नव्हती. पण सिद्धार्थजवळ गाडी चालवण्याचा परवाना – लायसन्स होते. म्हणून एका 'मोठं कुटुंबा सुखी कुटुंब' हे घोषवाक्य असलेल्या एका मित्राने दोन गाड्या घेण्याची तयारी दाखवली. मात्र ही तयारी दर्शवताना एक टोमणा कम अट घातली. भाभींनी (म्हणजे मी) एका क्षणासाठीही माहेरी डोकवायचे नाही. सारा वेळ ग्रृपमध्येच असले पाहिजे, अशी! कार्यक्रम इतका छान होता की त्यांची अट धुडकावण्याचा विचारही मनात येऊ नये.

कार्यक्रम रविवारी सायंकाळी होता. हिवाळ्यात रविवारी सकाळी जेवण झाल्यावर निघता आले असते. पण उन्हाळ्यात दुपारी प्रवास करावा असे कुणालाही पटणारे नव्हते. म्हणून शनिवारी लवकर जेवून रात्री आठच्या सुमारास निघायचे ठरले. कार्यक्रम संपायला कितीही उशीर झाला तरी रात्रीच अमदाबादला परतण्याचा बेत होता. त्या काळी राष्ट्रीय महामार्गावर (नॅशनल हाय वे) रहदारी हल्ली इतकी वाढली नव्हती. अर्थात रहदारी वाढू लागली होतीच. तरी बडोदा अमदावाद अंतर दोन तासात सहज पार होत असे. त्यामुळे हा बेत यशस्वी होण्यात काही अडचण येऊ शकेल, असा आम्ही विचारच केला नाही.

ठरल्याप्रमाणे आम्ही शनिवारी रात्री निघालो. दिवसभर मित्रमंडळींच्या सहवासात खूप मजा केली. सायंकाळच्या कार्यक्रमात ऐऱ्यागैऱ्यांनी लंबीचौडी भाषणे करून पिडले नाही. कधी कधी विख्यात साहित्यिकही कार्यक्रम गंभीरपणे न घेता कार्यक्रमाचा विचका करतात. तसेही झाले नाही. मस्त कार्यक्रमाची अपेक्षा असताना कार्यक्रम खरोखर मस्त झाला. मित्रमंडळाबरोबर सहकुटुंब सहल आणि मस्त कार्यक्रम दोन्ही पदरात पडल्यामुळे सारे रंगात आले होते. पण कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे दहा वाजले होते. म्हणून लगेच निघायची लगबग सुरू झाली. ते योग्यही होते. कारण कार्यक्रमाच्या मध्यंतरात अल्पोपहाराच्या नावाने सर्वांनी खूप खादडी केली होती. त्यामुळे जेवणात वेळ दवडवण्याची गरज नव्हती. शिवाय परतीच्या बाजूस तासाभराच्या अंतरावर हाय वे वर एक उत्तम ढाबा होता. तिथले दाळवडे (सालीसकटच्या मुगाच्या डाळीची बोंडे) जगप्रसिद्ध होते. लंडन-न्यूयॉर्कचे लोकही या ढाब्यास वाकडी वाट करूनही भेट देत असत. तिथे थांबण्याचा विचार होताच म्हणून आम्ही सर्वांनी झटपट प्रस्थान ठेवले.

घाईने निघण्याचे अजून एक महत्वाचे कारण होते. या ढाब्यात मिळणाऱ्या दाळवड्यांची चव जशी जगप्रसिद्ध होती तशी त्याच्या मालकाच्या विक्षिप्तपणाचीही जगभर चर्चा होती. ढाबा बाराच्या ठोक्यास बंद होत असे. वेळेच्या बाबतीत कधीही तडजोड न करण्यासाठी ढाब्याचा मालक दाळवड्याइतकाच कुख्यात होता. मुलांना भूक लागलीच तर जवळ असलेले काहीबाही त्यांना देऊन वेळ मारुन नेण्याचा विचार करून आम्ही तातडीने निघालो होतो.

रात्र गहिरी झाली होती. सिद्धार्थला ड्रायव्हिंगचा सराव नव्हता. शिवाय गाडी स्वतःची नसल्याचाही मनावर तणाव असतो. त्यामुळे ते सावकाश गाडी चालवत होते. आम्ही इतरांच्या थोडे मागे पडलो. त्यात पुढे परतीच्या मार्गावर रस्त्याच्या रुंदिकरणाचे काम चालू असलेला पट्टा सुरू झाला. रस्ता चौपदरी झाला की वाढत्या रहदारीची समस्या संपून चांगली सोय होणार होती. पण तोवर काम चालू असलेला विशिष्ट पट्टा अत्यंत अरुंद झाला होता. गाडी

ओव्हरटेक करता येऊ नये असा! तरी ढाबा माहित असल्याने तिथे सारे जमतील, अशी खात्री होती. म्हणून तो तणाव मनावर नव्हता. पण अचानक....

कार मिररमध्ये रुग्णवाहिनीचा लाल दिवा दिसू लागला. पाठोपाठ जोरजोरात हॉर्न! अँब्युलन्सला रस्ता करून देणे सुजाण नागरिकाचे कर्तव्य असते. पण अरुंद रस्त्यावर रांगेतच गाड्या जात होत्या. म्हणून ते जमेना. कुणाचे जीवन धोक्यात असल्याची जाणीव छळत असूनही रुग्णवाहिनीस जागा करुन देणे मात्र जमत नव्हते. “हा पट्टा संपेतो रस्ता करून देणं जमलं नाही तर हो?” मी अस्वस्थ स्वरात विचारले. मागे हॉर्न दणादण वाजतच होता. कार मिररमध्ये लपलपणारा लाल दिवा नर्व्हस करत होता.
“गाडी चालवण्याचा सराव नसताना आपण होकार देणं चूक वाटतंय आता! माझ्या अक्षमतेपायी ही रुग्णवाहिनी शववाहिनी ठरू नाही म्हणजे झालं! फार अगतिक झाल्यासारखं नर्व्हस वाटतंय गं!“ सिद्धार्थच्या स्वरात टिपेची लाचारी होती. ना मला आश्वासक शब्द सापडले की माझ्यात होती अँब्युलन्सच्या हॉर्नचा आवाज थांबवण्याची क्षमता! अगतिकतेची परमावधी आम्हा दोघांना कुरतडत होती. म्हणून ह्यांनी गाडी कच्च्या रस्त्यावर घ्यायचे ठरवले. पण ते सोपे नव्हतेच. रुंदिकरणासाठी रस्ता खणलेला होता. त्यामुळे बाजुच्या कच्च्या रस्त्याची पातळी खोलात गेली होती. त्यात गाडी उतरवण्यात ती कोलमडण्याचे भय होते. तरी प्रयत्नाची शर्थ करून त्यांनी संभाळून गाडी कच्च्या रस्त्यावर उतरवली. अँब्युलन्स पुढे गेली आणि आम्हाला कृतकृत्यतेचे समाधान लाभले. पण....

हे समाधान अल्प काळच टिकले. कारण आता गाडी विचित्र स्थानी अडकली होती. रात्र झाल्यामुळे ट्रक्सची रहदारी वाढली होती. गाडीस खड्ड्यातून बाहेर काढून हायवेच्या रहदारीच्या वाहनांच्या प्रवाहात घुसवणे फक्त जिकिरीचेच नव्हे तर जोखमीचेही होते. तरी ते केल्याविना चालणार नव्हते. पुढे गेलेले मित्र काळजीत असतील, याची जाणीव होती. रात्रीचा अंधार, ट्रक्सचा वाढता राबता, स्वतःची नसलेली गाडी आणि मागे अर्धवट झोपेत असलेली स्वतःची मुले! समग्र परिस्थिती भयजनक वाटत होती. स्वतःच्या काळजाचे ठोके स्वतःलाच भिववत होते. तरी अत्यंत सतर्क राहून यांनी ते अग्निदिव्य पार पाडले. पुन्हा गाडी धीम्या गतीने पुढे सरकू लागली. अरुंद पट्टा संपल्यानंतर मात्र ह्यांनी गाडी अक्षरशः हाणली. बारा वाजायला अवघी पंधरा मिनिटे बाकी असताना आम्ही ढाब्याशी पोहोचलो.

ढाब्याच्या पार्किंग प्लेसमध्ये ‘ती’ पाहून मी चक्रावले. बोट दाखवून मी ह्यांचे लक्ष वेधले. त्यांना ती दुसरी असावी, असे वाटले. मला ते पटले नाही तरी ही वाद घालण्याची वेळ नाही, हे मात्र पटत होते. म्हणून मी गप्प बसले. गाडी लावून आम्ही आमच्या मंडळीत सामील झालो. सारे चिंतित होते. ह्यांना गाडी चालवण्याचा सराव नसल्याने असे झाले असेल, असे आश्वासन एकमेकांना देत-घेत होते. पण सामान्य परिस्थितीत आमची गाडी मागे पडली तरी पाच-दहा मिनिटांच्या फरकाने आम्ही पोहोचणे अपेक्षित होते. तसेच घडले असते. पण अँब्युलन्सला रस्ता करून देण्यात आणि मग पुन्हा गाडी हायवेवर घेण्यात आमचा खूप वेळ मोडला होता. सारे सांगून ह्यांनी तरी अँब्युलन्सला वाट करून देणे जमले, यासाठी समाधान व्यक्त केले.

ढाबा बंद करायला मालकाची लगबग चालू होती. पार्किंग स्पेसमध्ये आता फक्त आमच्या गाड्या होत्या आणि ‘ती’! शेजारच्या टेबलवर काही प्रतिष्ठित मंडळी खाणे संपवून शीतपेयांचा आस्वाद घेत होती. मित्रांनी आमच्यासाठी थोडे वडे बांधून घेतले होते. खुर्चीवर बसून घोटभर पाणी पिता येणे सिद्धार्थला हवे होते. नव्हे ती त्यांची गरज होती. पण ढाब्याच्या मालकाने घड्याळाकडे बोट दाखवले. एक मित्र कळकळीची विनंती करत होता नि मालक विनंतीचा अव्हेर! तोच लगतच्या टेबलवरचा एक माणूस शीतपेय संपवून ह्यांच्याकडे आला. ह्यांच्याशी हस्तांदोलन करून तो तृप्त स्वरात बोलू लागला...

"थँक्स फॉर गुड ट्रिट! त्याचं काय आहे, गेल्या कित्येक दिवसांपासून इथे दाळवडे खायला यायचं ठरवत होतो. पण एक जण आहे तर दुसरा नाही, असंच चाललं होतं. आज सारा बेत जुळून आला तर एकाला इमर्जन्सी केस बघायला जावं लागलं. त्या पेशंटच्या डेथ सर्टिफिकेटपर्यंत सारं संपवताना त्याला झाला बराच उशीर! या ढाब्याचा मालक जरा विक्षिप्त आहे. बारा वाजले की तो ढाबा बंद करतो. वडे मागणाऱ्याच्या तोंडाला पानं पुसतो – जशी आत्ता तुमच्या तोंडाला पुसतो आहे. म्हणून आमच्यातील एकाला युक्ती सुचली – आपल्या गाड्यांऐवजी अँब्युलन्स काढण्याची! तुम्ही पुढे कुठच्याही ढाब्यावर पोट भरू शकाल हो! पण खऱ्या खवय्याला पोट भरणं नव्हे तर इथलेच स्वादिष्ट वडे खाणं हवं होतं. म्हणून…" असे म्हणून तो खदखदून हसला.

क्षणभर सिद्धार्थ गोंधळले. पण लगेच त्यांच्या जोक्यात लख्ख प्रकाश पडला. अंधारात गाडी कोलमडण्याचे भय असून त्यांनी अँब्युलन्सला वाट मोकळी करून दिली होती. लोकाची गाडी आणि स्वतः तसेच स्वतःचे कुटुंब पणास लावून! ते करताना उडालेली तारांबळ, केलेली कसरत, वाढलेले हृदयाचे ठोके… सारे काही कुणाचा जीव वाचवण्यासाठी नव्हे तर खवय्यांच्या खादडीस दाद देण्यासाठी होते, हे त्यांना सहन होईना. नंतरही मित्र काळजीत असतील याचे भान ठेवून त्यांनी गाडी वेगाने हाणली होती. तेच नव्हे तर इतर कित्येकांनी नैतिकतेचे भान ठेवून अँब्युलन्सला वाट करून देण्यासाठी जीव मुठीत धरून असेच केले असणार, याचीही त्यांना दाहक जाणीव झाली. यातील कुणाचे बरे-वाईट झाले असते तर? तर हे शहाणुराव डेथ सर्टीफिकेट देण्यासही तिथं असणार नव्हते, हा विचार त्यांच्या मनात चक्रीवादळ उठवत होता. सात्विक संतापास उधाण येत होते. आपल्याला कुणी उल्लू बनवले, याची जाणीव कुणालाही सुखद वाटत नाही. त्यात ते आणि त्यांच्यासारखे काही लोक सज्जनतेपायी उल्लू बनले होते. उरलेल्यांना निदान नको त्या लोकांसाठी आपण नैतिकता पणास लावून भलते साहस केल्याचे कळले तरी नव्हते. त्यामुळे त्यांच्या मनात नैतिक कर्तव्य पेलल्याचे निखळ समाधान असणार होते. पण सिद्धार्थला आपल्याला मूर्ख बनवण्याचा बेरकीपणा घडल्याचे कळले. तरी राग व्यक्त करण्याने हाती काहाही लागणार नव्हते. स्वतःच्या अगतिकतेसाठी त्यांच्या मनात कमालीचा तिरस्कार उमटला. त्या तिरमिरीत मालकाचे लांगुलचालन करणाऱ्या मित्राकडे पाहून ते काहीशा वरच्या स्वरात ओरडले, "आपण लगेच निघू. मी तृप्त आहे. काहीही नकोय मला! लेट्स गो!" झटक्यात पाठ फिरवून ते तरातरा गाडीकडे धावले.
"सांभळो छो?" क्षणापूर्वी नियमाचा हट्टाग्रह धरत तुसडेपणाने घड्याळ दाखवणाऱ्या मालकाच्या स्वरात असीम मार्दव प्रगटले. ह्यांच्या मागे धावत जाऊन त्याने त्यांचा खांदा थोपटत तो आर्जवी स्वरात म्हणाला, "बेसो ने! बांधलेले वडे गार झाले असतील. त्यात गरम वड्यांची मजा नसेल. मी नवा घाणा टाकायला सांगतो. पण सारं आवरलंय नं? म्हणून थोडा वेळ लागेल, तेव्हढं मात्र चालवून घ्या. प्लीज, तुम्ही पाणीही न पिता इथून निघून गेलात तर रात्रभर झोप येणार नाही मला!" त्याच्या आर्जवी स्वराने सिद्धार्थच्या पारदर्शक मुद्रेवर चलबिचल निर्माण केली. त्यांचा हात धरून मालकाने त्यांना परत फिरवले.

डॉक्टर्सच्या ग्रुपलाही मालकाने थांबवून घेतले. त्याने खऱ्या चाहत्याची त्याने कदर केली नि आपला नियम मोडला, असे डॉक्टरमंडळी आपसात बोलत होती. ते सारे निहायत खुश झाले होते. मालक नोकरांना सूचना देण्यासाठी आत गेला. बाहेर येऊन त्याने नोकरास आमची टेबल्स एकमेकांना जोडून घेण्याचा आदेश दिला. डॉक्टर्स आणि आम्ही सारे एकाच ग्रुपचे असल्यागत त्याने सर्वांना एकत्र बसण्याची विनंती केली. ह्यांचा सदैव वाद टाळण्याकडे कल असतो. तरी त्यांच्या मुखावरील तीव्र नापसंतीचे भाव शमले नव्हते की कपाळावर नापसंतीदर्शक टरटरून फुगलेली नस शांतवली नव्हती. मालकाने त्यांच्याकडे रोखून बघितले. पुन्हा त्यांचा खांदा थोपटून त्याने त्यांना आपल्या शेजारच्या खुर्चीत बळेच बसवले. डॉक्टर मंडळींकडे बघत तो बोलू लागला…
"मी अल्पशिक्षित! तुमची इंग्रजीत चाललेली बातचित मला सारी नीट कळली, असं मी म्हणणार नाही, साहेब! तरी जे कळलं त्यावरून मला एक सत्यकथा आठवली. ती तुम्हाला सांगण्याची इच्छा अनावर झाली. वडे होण्यास थोडा

वेळ लागेल. म्हणून आधी ती कथा ऐका." वेगळी वाटणारी त्याची थंड नजर डॉक्टरांवर खिळली. डॉक्टरांनाही कथा एकणे आवडेल, अशी आशा व्यक्त करून त्याने सिद्धार्थकडे बघितले. त्यांचा मूड बदलला नसल्याचे पाहून नजरेने आश्वासन देत तो पुन्हा बोलू लागला...

बाबा रामदेव पीर हे नाव तुमच्यातील बहुतेकांनी ऐकले असेल. कुणी म्हणतात तो जेसलमेरचा राजा होता. कुणाच्या मते पहिल्यापासून तो फकिरी मानसिकता असेला सामान्य माणूस होता. काही असो. नदीचं मूळ आणि ऋषीचंच नव्हे तर कुणाचंही कुळ थोधू नये, हे बरं! शिवाय नाही मला इतिहासाच्या वादात पडायचे की बाबा रामदेवचे गोडवे गात तुम्हाला बोअर करायचे! मला फक्त त्याच्या जीवनाइतकीच मशहूर असलेली एक सत्यकथा वा अख्यायिका सांगायची आहे. ती खरी की खोटी, या वादातही मला पडायचं नाहीय. कदाचित तुमच्यापैकी काहींना ती ठाऊकही असेल. पण मी तुमच्या शिकलेल्यांच्या कळपात न शोभणारा सामान्य माणूस! तरी मला 'माणूस' असण्याचा सार्थ अभिमान आहे. त्यामुळेच ही अख्यायिका ठाऊक असण्यापेक्षा तिचा मथितार्थ समजून घेणं मला महत्वाचं वाटतं." त्याने पुन्हा एकदा ह्यांच्याकडे आश्वासक नजरेने बघितले. किंचित घसा खाकरून तो कथानकास भिडला...
"बाबा रामदेव पीर राजस्थानातला! त्याच्या नावावरून जातीजमातीचा वा धर्माचा अंदाज करणं जमू नये असा! हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समाजात प्रिय असलेला संत! साऱ्यांच्या मनात त्याच्या कार्याविषयी नितांत आदर! तो सदैव जनसेवेत मग्न असे. त्याचा एक अत्यंत उत्तम घोडा होता. चपळ आणि देखणा! प्रत्येकास असा घोडा आपल्यापाशी असावा, असं वाटे. काहींना तर तो चोरण्याचीही इच्छा होत असे. जनसेवेच्या कामात रामदेवची सोय जपण्याच्या उद्देशानं – प्रसंगी गैरसोय वा खोळंबा होऊ नये, यासाठी एका श्रीमंत चाहत्यानं रामदेवास तो भेट दिला होता. खरोखर त्या घोड्यामुळे रामदेवची खूप मदत होत असे नि त्याचा वेळ तसेच शक्ती वाचत असे. या घोड्याची बरोबरी करू शकेल असा घोडा त्या काळी उभ्या राजस्थानात नव्हता. त्याच्यासाठी कित्येक रइस रामदेव मागेल ती किंमत त्यास देण्यास तयार होते. पण रामदेव अत्यंत प्रेमाने त्या घोड्याचा प्रतिपाळ करत असे. त्यास क्षणभरही विसंबत नसे. त्यामुळे हा घोडा खरीदणेच नव्हे तर चोरणेही कुणाला जमत नसे.

त्या काळी राजस्थानात चोर-दरोडेखोरांचे फार प्राबल्य होते. एकदा एका कुख्यात दरोडेखोराने रामदेवच्या घरावर दरोडा घातला. दरोडेखोरांच्या नायकाने रामदेवच्या छातीवर बंदूक रोखली आणि मदतनीसास बांधलेला घोडा सोडण्याचा आदेश दिला. रामदेव मोठमोठ्याने हसू लागला. दरोडेखोर गोंधळला. त्यानं हसण्याचं कारण विचारलं.
"अरे मी निःशस्त्र! तरीही तुला माझ्यावर बंदूक रोखावी लागतेय. मला तुझ्या बंदुकीचं भय कधीच वाटणार नाही. पण मला तुझी दया येतेय नि हसूही! मला मारून तू घोडा मिळवलास तर तुझ्या सहकाऱ्यांना आपला नायक निःशस्त्रावर शस्त्र उगारणारा भ्याड आहे, हे कळेल. मला याचं हसू येतंय. खरा मर्द असशील तर घोडा चातुर्यानं मिळव. सहकाऱ्यांसमक्ष तुझं हसं होतंय, याची लाज बाळग! कौशल्य पणास लावून घोडा मिळव! बंदूक परजून नव्हे."
दरोडेखोर खजिल झाला.
"आज मी घोडा नेत नाहीय. पण ...." तो पुटपुटला, "मी शस्त्राच्या मदतीविना कौशल्यानं तुझा घोडा नेण्याचं आव्हान स्वीकारलंय, हे तू लक्षात ठेव."

"रामदेव घोड्याची अत्यंत सावधतेनं काळजी घेत असल्यानं मुळात हे काम अवघड! दरोडेखोरानं आव्हान स्वीकारल्याचं जाहिर केल्यावर तो घोड्यास अधिकच जपू लागला. डोळ्यात तेल घालून! म्हणून मग रामदेव घोडा क्षणभरही दृष्टिआड होणार नाही, अशी रखवाली करू लागला.

एकदा जनकाजासाठी तो घोड्यावरून कुठेसा जात होता. त्याच दिशेने रस्त्याच्या कडेने एक लंगडा कण्हत कुंथत खुरडत पुढे जात असलेला त्यास दिसला. कनवाळू रामदेवने त्यास मदतीचा हात दिला. लंगड्यास जायचे होते त्याच

दिशेस रामदेवही जात असल्यानं त्यानं लंगड्यास घोड्यावर बसण्याची विनंती केली. पण आपलं आपण घोड्यावर बसता यावं, इतकंही कौशल्य त्या लंगड्यात नव्हतं. म्हणून रामदेवनं त्यास हाताचा आधार दिला. पण तरीही त्यास घोड्यावर चढता आलं नाही. म्हणून आधी त्याला घोड्यावर बसवून मग आपण स्वार व्हावं, असा विचार करून रामदेव घोड्यावरून उतरला. त्यानं लंगड्याला घोड्यावर चढवलंही, पण तो स्वतः स्वार होण्यापूर्वी त्या लंगड्यानं घोड्यास टाच मारली. मागे वळून बघत तो रामदेवला म्हणाला, "मी त्या दिवशीचा दरोडेखोर! तुझं आव्हान स्वीकारलेला! शस्त्राच्या मदतीविना घोडा मिळवण्याचा विडा उचललेला! मी कौशल्यानं घोडा हस्तगत केला आहे."
"घोडा हस्तगत केलायस, पण कौशल्यानं नव्हे! लांडीलबाडी नि फसवणूक म्हणजे कौशल्य नव्हे." रामदेव शांत स्वरात म्हणाला. "घोडा मिळवण्यासाठी तू लंगड्याचं सोंग घेतलंस, हे बरीक कुणाला कधी सांगू नकोस. तुला अब्रू नसल्यानं ती जाण्याचा प्रश्न नाहीय. पण हे कळल्यावर लोक लंगड्या लाचारांवर विश्वास ठेवणं बंद करतील. अशी मदत करणं स्वतःस मूर्ख सिद्ध करणं ठरेल, या भयानं सज्जनांनी गरजू लोकांना मदत करणं सोडलं तर अपंगाचं पारावार नुकसान होईल. म्हणून तू घोडा कसा मिळवलास ते बरीक कुणाला सांगू नकोस."

'त्या' दिवशी घोड्याविना रामदेव वेळेवर शेजारच्या गावी पोहोचू शकला नसता. म्हणून अर्ध्या वाटेवरून तो घरी परतला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याला जाग आली ती घोड्याच्या फुरफुरण्याने! त्याने बाहेर येऊन बघितले तर मूळ जागेवर बांधलेला त्याचा घोडा रामदेवला साद घातल्यागत फुरफुरत होता."

रामदेवच्या जीवनातील प्रसंगाचे कथन संपवून ढाब्याचा मालक व्यथित स्वरात म्हणाला, "म्हणजे त्या काळी दरोडेखोरीचा हीन व्यवसाय करणारेही नैतिकतेस प्राधान्य देत आपला व्यवसाय करत असत. आता मात्र स्वतःच्या व्यवसायास नोबल प्रोफेशन म्हणवणारे नि सभ्य माणसाची झूल पांघरणारे नाटकी लोक दरोडेखोरांच्या कक्षेस उतरलेत, असंही म्हणता येत नाही. त्यांच्या अनैतिक वर्तनाने आताशा दरोडेखोरांची कक्षा पार केली आहे. माझ्या ढाब्यावरील दाळवड्यांच्या मोहानं हे घडवलं आहे. म्हणजे या पापात माझाही वाटा आहे, याची जाणीव मला व्यथित करते. डॉक्टरसाहेब...." अनायास त्याचा स्वर कठोर बनला, "आज ढाब्याची वेळ संपली असूनही मी साऱ्यांना दावत देतोय. याचे पैसे मी आकारणार नाहीय. अँब्युलन्सचा असा वापर पुन्हा करू नका, असं सांगण्याचा अधिकार असायला मी बाबा रामदेव पीर सारखा महान संत नाही. तुम्ही इतरत्र काय करता, ते कळण्याजोगी संजयदृष्टी माझ्यापाशी नाही. पण हा ढाबा माझा आहे. या पुढं माझ्या ढाब्याशी मी कधीही अँब्युलन्स उभी राहू देणार नाही, हे नक्की! तर ते असो. दाळवड्यांचं काम कुठवर आलंय, त्याची मी चौकशी करून येतो."

ढाब्याचा मालक भारदस्त पावलं टाकत निघून गेला. रीकाम्या प्लेट्स घेऊन नोकर बाहेर आला. तो टेबलवर सरंजाम मांडू लागला. सर्वत्र खमंग दाळवड्यांचा घमघमाट सुटला होता. रसनेस उद्दिपित करणारा! पण डॉक्टरांच्या कंपुच्या जिभेची चव हरपली होती. स्वादिष्ट दाळवडे घशाखाली उतरणार नाहीत, याची त्यांना रास्त जाणीव झाली. 'भूक नाही, पोट तुडुंब भरलंय...' असं थातुर-मातुर पुटपुटत सारे अँब्युलन्सकडे धावले. मालक बाहेर येण्यापूर्वी त्यांनी तिथून अक्षरशः पळ काढला. मग त्या दिवशी गरमागरम दाळवड्यांना अनोखी चव प्राप्त झाली, हे सांगायची आता गरज उरली आहे का?

पूर्व प्रसिद्धी अखिला जून १९९४